International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

**Original Article**

# ग्रामीण भागातील रोकडविरहीत व्यवहार : तारळे खोऱ्याचा विशेष अभ्यास

**डॉ. गजानन खामकर**

*सहाय्यक प्राध्यापक,*

*अर्थशास्त्र विभाग , सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय ,सातारा*

**Manuscript ID:** IJAAR-B130386
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 569 - 571**

**Submitted:** 17 Jan.2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
***डॉ. गजानन खामकर***

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322615

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.20322615

Creative Commons

***सार:***

*सुरुवातीच्या काळात वस्तू विनिमय पद्धती अस्तित्वात होती. या वस्तू विनिमय पद्धतीत वेगवेगळ्या अडचणींचा सामना लोकांना करावा लागत होता यावर मात करण्यासाठी पैशाचा शोध लागला सुरुवातीला वेगवेगळ्या वस्तूंचा वापर पैसा म्हणून केला जात होता त्यानंतर धातू पैशाचा वापर पैसा म्हणून करण्यात येऊ लागला धातू पैशाचा वापर करत असताना मोठ्या रकमेचे व्यवहार करण्यात अडचणी येत होत्या तसेच मौल्यवान धातूंचा वापर नाणी बनवण्यासाठी करावा लागत होता. यावर उपाय म्हणून कागदी नोटांचा वापर पैसा म्हणून करण्यात येऊ लागला. त्यानंतर धनादेश क्रेडिट कार्ड,डेबिट कार्ड यांचा वापर पैसा म्हणून करण्यात येऊ लागला. व अलीकडील काळात क्रिप्टो करेंसी मोबाईल मनी ऑनलाईन बँकिंग याचा वापर व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढला. ग्रामीण भागात देखील रोकड विरहित व्यवहार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. या संशोधन पेपर मध्ये रोकड विरहित व्यवहाराबाबतचा लोकांचा दृष्टिकोन काय आहे आणि लोकांना याचा वापर करत असताना कोणत्या अडचणीचा सामना करावा लागतो. तसेच रोकड विरहित व्यवहार समस्या सोडवणूक करण्यासाठी कोणत्या उपायांची आवश्यकता आहे. याचा अभ्यास सदर संशोधनात करण्यात आला आहे. सदर अभ्यासाकरता अन्वेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*डॉ. गजानन खामकर. (2026). ग्रामीण भागातील रोकडविरहीत व्यवहार : तारळे खोऱ्याचा विशेष अभ्यास. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 569 - 571.* https://doi.org/10.5281/zenodo.20322615

**प्रस्तावना:**

आर्थिक व्यवहार पारदर्शक असावेत, आर्थिक व्यवहारांची गती वाढावी, चलन खराब होऊन ते बदलण्याचा खर्च कमी व्हावा, लोकांच्याकडे निष्क्रिय स्वरूपात पडून असणारा पैसा बँकांमध्ये यावा, त्याचा वापर भांडवल गुंतवणूक साठी होऊन देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढावा या उद्देशाने मोदी सरकारने एक सुनियोजित आराखडा तयार केला. त्या आराखड्यानुसार सुरुवातीला त्यांनी प्रत्येक कुटुंबापर्यंत प्रधानमंत्री जनधन योजना यांच्या माध्यमातून बँक खाती पोहोचवली. तदनंतर नोव्हेंबर 2016 मध्ये झालेले विमुद्रीकरण

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

व नंतर 2019 - 20 मध्ये आलेले कोविड संकट यामुळे आर्थिक व्यवहारातील रोख पैशाचा वापर कमी होऊ लागला व त्यानंतर छोटे-मोठे व्यवहार देखील रोकड विरहित होऊ लागले. सदर संशोधनातून ग्रामीण क्षेत्रातील लोकांचा रोकड विरहित व्यवहाराबाबतचा दृष्टिकोन काय आहे हे जाणून घेतला आहे.

**संशोधन समस्येचे विधान**:

अलीकडील काळात रोकड विरहित व्यवहारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सरकारने ज्या उद्देशाने हे रोकड विरहित व्यवहार सुरू केले ग्रामीण भागातील लोकांवर नेमका परिणाम कोणता झाला, ग्रामीण भागातील लोकांचा रोकड विरहित नेमका दृष्टिकोन कसा आहे तसेच या व्यवहारांचा वापर करत असताना त्यांना अडचणी कोणत्या येतात याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**:

1) रोकड विरहित व्यवहाराबाबत वापरकर्त्यांचा दृष्टिकोन काय आहे हे जाणून घेणे.

2)रोकड विरहित व्यवहार करण्याचे उद्देश समजावून घेणे.

3) रोकड विरहित व्यवहार करताना येणाऱ्या अडचणी समजावून घेणे.

4) रोकड विरहित व्यवहार करताना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**गृहीतक**:

1)रोकड विरहित व्यवहाराच्या वापराबद्दल ग्रामीण वापरकर्ते समाधानी आहेत.

**संशोधन पद्धती:**

1) अभ्यास क्षेत्र - सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील तारळे खोऱ्यातील ग्रामीण भाग
2) नमुना निवड- यादृच्छिक नमुना पद्धतीने 200 व्यक्तींची निवड
3) तथ्य संकलन -प्राथमिक सामग्री - प्रश्नावली, निरीक्षण
4) तथ्य विश्लेषण - शेकडेवारी पद्धत, वृत्तालेख,
5) अभ्यास कालावधी- सप्टेंबर 2025
6) संशोधन प्रकार - अन्वेषणात्मक संशोधन
7) संशोधन मर्यादा - तारळे खोऱ्यातील ग्रामीण भागातील लोकांपुरते मर्यादित

**तथ्य विश्लेषण**:

**तक्ता क्र. १तारळे भागातील लोकांची रोकड विरहीत व्यवहाराचे अनुभव**

| अ.नं. | रोकड विरहीत व्यवहार अनुभव | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | रोकड विरहित व्यवहार पद्धतींबद्दल माहिती | ९२.१ |
| २ | रोकड विरहीत व्यवहारपासून खर्च प्रवृत्ती वाढली | ८४.१ |
| ३ | रोकड विरहीत व्यवहारामुळे भ्रष्टाचार घट | ८६.८ |
| ४ | रोकड विरहीत वापरापासून आर्थिक फसवणूक प्रमाण वाढले | ५७.९ |
| ५ | रोकड विरहीत व्यवहारात फसवणूक झाली | २६.३ |
| ६ | रोकड विरहीत व्यवहारात फसवणूक झाल्यास सायबर सेल कडे तक्रार करणे आवश्यक | ८६.८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | रोकडविरहित व्यवहार भविष्यात अधिक प्रमाणात लोकप्रिय होतील | ८९.५ |
| ८ | रोकड विरहीत व्यवहार करता त्याचे ACCOUNT STATEMENT तपासतात | ९४.७ |
| ९ | रोकड विरहीत व्यवहार असावेत | ९४.७ |

संदर्भ - अभ्यास क्षेत्र सर्वेक्षण- सप्टेंबर २०२५

**गृहीतक चाचणी:**

रोकड विरहीत व्यवहाराबाबत ९२% वापरकर्ते समाधानी आहेत.

**निरीक्षणे**:

1) 47.4% लोक रोख रक्कम जवळ बाळगण्याची आवश्यकता नसणे, व्यवहारांची नोंद करून ठेवावी न लागणे, आर्थिक व्यवहारांची गती वाढणे, सुट्ट्या पैशावरून होणारे वाद टाळणे अशा सर्व फायद्यांमुळे रोकड विरहित व्यवहार करतात.

2) 39.5% लोकांना ऑनलाईन व्यवहारापासून अधिक समाधान मिळते.

3) दररोज डिजिटल व्यवहार करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक 47.4% आहे.

4) सर्वाधिक 50% लोकांना इंटरनेटच्या अभावामुळे रोकड विरहित व्यवहार करण्यात अडचण येते.

5) 34.2% लोकांना ऑनलाईन व्यवहारापासून रोख व्यवहारांच्या तुलनेत अधिक समाधान मिळते.

6) रोकड विरहित व्यवहाराबद्दल 92 % टक्के लोक समाधानी आहेत.

7) सर्वाधिक 36.8% लोकांना रोकड विरहित व्यवहार करण्यात सायबर गुन्हेगारीचा धोका ही अडचण जाणवते.

8) 84.1% लोकांची खर्च प्रवृत्ती रोकड विरहित व्यवहारांमुळे वाढली.

**उपाययोजना**:

1)रोकड विरहित व्यवहारांमधील लोकांची फसवणूक टाळण्यासाठी बिगर सरकारी संस्थांमार्फत लोकांना या व्यवहाराच्या वापराबद्दल जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

2) बँकांनी रोकड विरहित व्यवहार कसे करायचे याबाबत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

3) उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयानी विस्तार उपक्रमांतर्गत लोकांमध्ये विरहित व्यवहाराच्या वापराबद्दल जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**:

1) डॉ. गुरुनाथ नाडगोंडे ( २०१२ ) सामाजिक संशोधन पद्धती,फडके प्रकाशन ,कोल्हापूर

2) )Reserve Bank of India ( 2024 - 2025) Handbook on Statistics of Indian Economy

3) C.R. Kothari, Gaurav Garg(2019): Research Methodology Methods and Techniques, New Age International Publishers; Fourth edition